# हेमू भूपाली

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**हेमू भूपाली : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ १९०/-

# हेमू भूपाली

# १

त्यावर्षीच्या जानेवारी महिन्यातील १४ तारखेला संक्रांतीनं पाऊल टाकलं ते विस्मयाच्या चुळा फेकीतच! लोकांना आश्चर्यचकित करणाऱ्या एका शोचनीय वार्तेच्या पंखावर बसूनच त्या वर्षीची ती संक्रांत आनंदनगरात प्रविष्ट झाली! 'अंजन' नावाच्या स्थानिक दैनिकाचे अंक घरोघर टाकले गेले, आणि ज्यानं म्हणून तो अंक उचलून त्याच्या दर्शनी पानावर नजर टाकली, तो खूपच खूप जाड टाईपात छापलेल्या सहा कॉलनी मथळ्याकडे हतबुद्ध होऊन बघतच राहिला...'' शालेय क्षेत्रात घडलेला एक अभूतपूर्व प्रसंग.'' त्या मथळ्याखाली जरा लहान टाईपात छापलेला दुसरा मथळा होता, ''एका विद्यार्थ्याने एका शिक्षकाला छडीमाराचा प्रसाद दिला!''

नंतर दहा वाजण्याच्या सुमाराला मुंबई-पुण्याची वृत्तपत्रं आली. त्यांनीही असेच मथळे देऊन घडलेल्या प्रसंगाचा वृत्तांत दिला होता!

वेगवेगळ्या वृत्तपत्रात मजकूर वेगवेगळा होता, परंतु मुख्य बातमी तीच होती. आनंदनगर हायस्कूलमध्ये मॅट्रिक्युलेशनच्या वर्गात तो अद्भुत प्रसंग घडला होता. मराठी गद्याच्या तासात! परांजपे नावाचे शिक्षक नित्याप्रमाणे वर्गात दाखल झाले होते. पहिल्या दोन तासांनंतरची दहा मिनिटांची 'रीसेस' संपली होती. तिसरा तास सुरू होत होता. श्री. परांजपे वर्गात शिरले होते. व्यासपीठावर चढून खुर्चीवर बसले होते. हातातलं पुस्तक उघडून ते म्हणाले होते. आज 'शिवाजी' या धड्याचा अभ्यास आपल्याला करावयाचा आहे. उघडा ५७ वं पान', ते पुस्तकातून धडा वाचू लागणार होते. तितक्यात शांताराम देवदास उभा राहिला होता आणि म्हणाला होता... 'सर, हा

धडा आपल्याला वाचता येणार नाही. कारण १० मिनिटांच्या सुटीत आम्ही सर्व विद्यार्थ्यांनी त्या धड्याची चार पानं फाडून टाकली आहेत. आणि फाडलेल्या सर्व पानांची चवड टेबलावर ठेवली आहेत. काड्याची पेटीही ठेवली आहे. ती सर्व पानं जाळून टाकण्याचा समारंभ तुमच्या हस्ते व्हावा अशी आमची सर्वांची इच्छा आहे.

ते ऐकून परांजपे स्तिमितच झाले. उंच आवाजात ते ओरडले, 'काय? काय म्हणालात?'

परांजपे मास्तरांच्या ओरडण्याने दचकून न जाता शांताराम देवदास शांत पण दृढ स्वरात म्हणाला, 'आम्ही सर्वांनी पुस्तकातली पानं फाडून टाकली आहेत. हा धडा घेता येणार नाही तुम्हाला. फाडलेली पानं तुमच्या टेबलावर ठेवली आहेत. ती तुमच्या हस्ते जाळून टाकण्यात यावी अशी आमची इच्छा आहे.'

परांजप्यांनी ओरडून विचारलं, 'कुणाच्या डोक्यातून ही सुपीक कल्पना निघाली? तुझ्याच काय?''

... शांताराम देवदास, हेमंत भूपाली व अमीर दलवाई हे तिघे मित्र नेहमी एका बाकावर बसत असत... मास्तरांचा प्रश्न ऐकून हेमंत भूपाली उभा राहिला आणि म्हणाला, ''कल्पना माझी आहे सर! मात्र ही कल्पना काढायला डोक्याच्या सुपीकतेची काही एक गरज नाही. ज्याच्या अंगी थोडा तरी देशाभिमान उरलेला आहे असा माणूस हा 'शिवाजी' धडा वाचील तर त्याचं रक्त तापल्यावाचून राहणार नाही. एकतर या लेखाचा जो कोण लेखक आहे... त्याचं नाव घेऊन माझं तोंड विटाळीत नाही... त्यानं सबंध धड्यात शिवाजी महाराजांचा उल्लेख जिथं तिथं एकवचनानं केला आहे. शिवाजी महाराज असं त्यानं कुठंही म्हटलेलं नाही. निकल्सन नावाचा कोण गोऱ्या कातडीचा लेखक आहे. त्याच्या पुस्तकातील मजकुराचा आधार घेऊन या धड्याचा लेखक म्हणतो, ''शिवाजीला यशामागून यश मिळत गेलं म्हणून तो स्वराज्याचा संस्थापक ठरला त्यानं स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला. 'गोब्राह्मण प्रतिपालक छत्रपती'' अशी किताबत त्यानं स्वत:च्या नावाला जोडली. त्याला त्याच्या उद्योगात अपयश मिळालं असतं तर तो एक हल्लेखोर लुटारू म्हणूनच इतिहासात नमूद झाला असता. औरंगजेब बादशहा शिवाजीला रानावनातला उंदीर म्हणत असे. आणि शिवाजीचं सत्यस्वरूप हेच होतं ''हे काय लिहिणं झालं? असला गलिच्छ धडा आम्ही शिकणार नाही. तुम्हाला शिकवू देणार नाही!''



असं म्हणता म्हणताच हेमू भूपाली घाईघाईनं मास्तरांच्या टेबलाजवळ गेला. मास्तरांनी उघडं पुस्तक टेबलावर ठेवलं होतं ते ओढून हाती घेतलं. त्यातली धड्याची चार पानं टराटरा फाडली, आणि टेबलावरच्या चवडीत ती ठेवली. तो मास्तरांना म्हणाला, 'हं. लावा सर आता या कागदांना काडी!'

... मास्तर नुसते बघत राहिले. तेव्हा हेमू अमीरकडे वळून म्हणाला, ''ये रे अमीर पुढे. ही घे काड्याची पेटी आणि लाव आग कागदांना.''

अमीर पुढे झाला. त्यानं काडी काढली, पेटवली, आणि त्या चवडीला लावली. मोठा जाळ झाला आणि त्याच वेळेला सर्व विद्यार्थी एका आवाजात ओरडले, ''श्री शिवाजी महाराज की जय!''

हा सारा प्रकार बघून परांजपे मास्तर आश्चर्यानं आणि संतापानं गोठूनच गेले. हातातली छडी उगारून ते म्हणाले, ''तुम्ही सारी मुलं पागल झाला आहात. तुमचा हा आगाऊपणा व उद्धटपणा मी चालू देणार नाही. देवदास ये पुढे आणि हात पुढे कर.''

देवदास शांतपणानं मास्तरांपुढे येऊन उभा राहिला. आणि त्यानं हात पुढं केला. मास्तरांनी छड्या मारावयास सुरुवात केली. तीन सपाटे हातावर मारल्यानंतर त्यांनी त्याच्या डाव्या दंडावर सपृदिशी ओढली. एकदा! दोनदा! आणि तिसऱ्यांदा ते छडी मारणार होते पण हेमू एकदम पुढे सरसावला! त्यानं मास्तरांचं मनगट असं काही दाबलं की ते विव्हळून ओरडले आणि त्यांच्या हातातली छडी गळून पडली. हेमूनं ती छडी उचलून घेतली. आणि तिचे सपासप असे दोन प्रहार मास्तरांच्या अंगावर ओढले.

त्याच क्षणी मास्तर घाईघाईनं वर्गातून निघून गेले! वर्गातले सारे विद्यार्थी घोळका करून त्यांच्यामागोमाग बाहेर गेले आणि त्यांनी पुन्हा घोषणा केली, ''श्री छत्रपती शिवाजी महाराज की जय!''

तो गलबला ऐकून आजूबाजूच्या वर्गातले विद्यार्थी वर्ग सोडून बाहेर आले. परांजपे मास्तरांच्या वर्गात आधी काय प्रकार घडला होता ते त्या विद्यार्थ्यांना माहीत नव्हतं; परंतु ते घोषणेत सामील झाले. शेपन्नास मुलं ओरडली, ''श्री छत्रपती शिवाजी महाराज की जय!''

शाळेच्या आवारात मोठीच धमाल उडाली!

या प्रकाराचा बोभाटा होण्यास अवधी लागला नाही. ज्याच्या त्याच्या तोंडी त्या दिवशी संध्याकाळी आणि रात्री हा एकच विषय होता. त्या प्रकाराचे परिणाम

काय होणार? विद्यार्थ्यांना कोणतं शासन होणार? परांजपे मास्तरांना छड्या मारल्याबद्दल काही शासन होणार काय? शांताराम देवदास, हेमू भूपाली आणि अमीर दलवाई यांना शाळेतून रस्टिकेट करण्यात येईल काय? इत्यादी इत्यादी. संक्रांतीच्या दिवशी तर साऱ्या वृत्तपत्रात या प्रकाराला मोठीच प्रसिद्धी देण्यात आली होती. वृत्तपत्रातील बातमी ज्यानं वाचली नव्हती असा आनंदनगरात एकही माणूस नव्हता. हायस्कूलचे मुख्याध्यापक काय करतात, कोणतं पाऊल टाकतात याकडे साऱ्या लोकांचं लक्ष लागून राहिलं होतं. काहीतरी सनसनाटी बातमी वाचायला मिळणार अशी साऱ्या माणसांची खात्री होती...

परंतु तसं काहीच घडलं नाही.

हायस्कूलचे मुख्याध्यापक दादासाहेब गोगटे अनुभवी आणि चतुर होते. स्वत:च्या जबाबदारीवर काही न करता शाळेच्या गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष हेमू भूपालीचे पिताजी राजेनभाऊ भूपाली यांची गोगटे सरांनी भेट घेतली होती व ''तुम्हीच या प्रकरणाचा विचार करा आणि काय निर्णय घ्यावयाचा ते ठरवा'' असं त्यांना ते म्हणाले होते.

... परांजपे मास्तरांना, हेमूला, शांतारामला आणि अमीरला त्यानी चिठ्ठ्या पाठवून कळविलं होतं की, ''राजेनभाऊ भूपाली यांच्या घरी उद्या रात्री बरोबर साडेआठ वाजता तुम्ही हजर व्हावयाचं आहे.''

... गोगटेसरांची चिठ्ठी वाचताच सारेजण मनातल्या मनात टरकून गेले होते.

राजेनभाऊ भूपाली म्हणजे ज्यांच्याविषयी सगळ्यांना कमालीचा आदर व दरारा वाटत असे अशी आनंदनगरातील बडी आसामी होती. त्यांच्यापुढे अपराधी माणसाच्या भूमिकेत उभं राहायचं म्हणजे मोठाच कठीण प्रसंग होता. हेमूचे ते पिताजी, पण त्यालादेखील त्यांच्याविषयी जितकं प्रेम होतं तितकाच धाकही होता. आता त्यांचा मुलगा म्हणून नव्हे तर एक गुन्हेगार विद्यार्थी या नात्यानं त्यांच्यापुढं त्याला उभं राहायचंय्. तोही मनातल्या मनात चांगलाच दचकून गेला.

रात्री बरोबर साडेआठ वाजता राजेनभाऊंच्या बैठकीच्या खोलीत सारेजण हजर झाले. ते बसले नाहीत, उभेच राहिले. पाच मिनिटांनंतर राजेनभाऊ खोलीत प्रविष्ट झाले. टेबलामागच्या खुर्चीवर बसले. टेबलाभोवतालच्या खुर्च्यांकडे खूण करून ते त्या चौघांना म्हणाले, ''बसा खुर्च्यांवर तुम्ही गुन्हेगार आहात तरी! खुर्चीवर



बसायला हरकत नाही. बसा!'' तरीदेखील ते उभेच राहिले. मग राजेनभाऊंनी त्यांना पुन्हा बसा असं म्हटलं नाही. एक मिनीटभर ते गप्प राहिले आणि नंतर म्हणाले, ''काय काय घडलं ते काही न लपविता एकेकजण सांगा पाहू. मास्तर, तुम्ही आधी बोला.''

साऱ्याजणांचं बोलणं त्यांनी लक्षपूर्वक ऐकून घेतलं. ते ऐकताना त्यांची मुद्रा निर्विकार राहिली. राग, लोभ, पसंती, नापसंती काहीदेखील त्यांच्या मुद्रेवर दिसलं नाही...

एकेकाळी ते कलेक्टरच्या हुद्यावर होते आणि अपराधी माणसांचे जबाब ऐकण्याची त्यांना सवय होती. ते म्हणाले, ''तुम्ही सारेजण गुन्हेगार आहात. तुम्हा सगळ्यांच्याच हातून घडू नये असा अतिप्रसंग घडला आहे. गोगटेसरांनी परांजपे मास्तरांना डिस्मिस् केलं पाहिजे व तुम्हा तिघांना रस्टिकेट केलं पाहिजे.''

त्यांच्या तोंडचे ते उद्गार ऐकून ते चौघेजण आश्चर्यचकित झाले नाहीत. माना खाली घालून ते उभे राहिले. त्यांना वाटलं चौकशी संपली आता शिक्षा भोगलीच पाहिजे. त्यांना वाटलं, राजेनभाऊ आता म्हणतील, 'जा चालते व्हा.' ते वाटच बघत राहिले.

परंतु राजेनभाऊ पुढे म्हणाले, ''पण अशी शिक्षा तुम्हाला करावी अशी गोगटे सरांना शिफारस करू इच्छित नाही मी. तुम्ही सारेजण पोरवयातले आहात. हा परांजपे मास्तर असला तरी कालच पदवीधर झाला आहे. तुमच्या आणि त्याच्या वयात अंतर किती असेल, फार तर पाच वर्षांचं. तुम्ही सारेजण अजून बच्चे आहात. तुमच्या आयुष्यावर ज्याचा काही विपरीत परिणाम होईल असं काही होऊ नये असं मला वाटतं. माझ्यादेखत तुम्ही एकमेकांची माफी मागा. चुकलो म्हणा. हस्तांदोलन करा. मित्र व्हा. म्हणजे या प्रकरणावर आपण पडदा टाकू. तुम्हा सगळ्यांकडून वर्गात जो तमाशा झाला त्याची जबाबदारी आहे ज्या लेखकानं 'शिवाजी' धडा लिहिला त्याची. सरकारी समितीच्या ज्या सभासदांनी हा घाणेरडा धडा असूनही पाठ्यपुस्तकासाठी पास केला त्यांची! शिक्षा झाली पाहिजे त्या लोकांना; पण ती करणं माझ्या हातात नाही. तुम्हा सगळ्यांनी हा पहिलाच गुन्हा केला आहे याचा फायदा मी तुम्हास देतो. तुम्हाला एक गोष्ट मात्र करावी लागेल. आता तुमच्यात आणि माझ्यात जे काही बोलणं झालं त्याची एक अक्षरानंदेखील वाच्यता तुम्ही करता कामा नये. सारं गुप्त राहिलं पाहिजे. हे करण्याची शपथ घ्या माझ्यापुढं आणि जा!''

हे सर्वजण दाराबाहेर जात होते इतक्यात राजेनभाऊनी हेमूला हाक मारली आणि ते म्हणाले, ''तू जाऊ नकोस... परत ये. तुझ्याशी काही बोलायचंय...''

हेमू परत आला आणि त्यांच्यापुढं उभा राहिला. ते त्याला म्हणाले ''मला एक सांग, शांतारामाला छडीमारातून वाचविण्यासाठी तू पुढे झालास हे ठीक झाले, पण परांजपे मास्तरांवर तू छडी चालविलीस ही गोष्ट फार वाईट झाली. ती का केलीस तू? सांग.''

हेमू क्षणभर गप्प राहिला आणि म्हणाला, ''सांगतो, चार दिवसांपूर्वी तुम्ही एक इंग्रजी पुस्तक मला दिलं होतं, फ्रँक कॉलिन्स नावाच्या लेखकाचं पुस्तक होतं ते. ते माझ्या हाती देताना तुम्ही म्हणाला होता, मॅट्रिकच्या वर्गात शिकणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्यांपेक्षा तुझं इंग्रजीचं ज्ञान अधिक आहे. ते मी तुझ्याकडून पक्कं करून घेतलं आहे; पण तरीदेखील हे पुस्तक तुला नीटसं समजेल असं मला वाटत नाही. वयानं व ज्ञानानं इतका मोठा तू अजून झालेला नाहीस, तरीपण या पुस्तकाचं प्रतिपादन तुला जेवढं समजेल तेवढं समजावं अशी माझी इच्छा आहे. तुमच्या इच्छेप्रमाणे मी ते वाचण्याचा प्रयत्न केला. त्यातला काही भाग माझ्या अल्प बुद्धीच्या पलीकडचा वाटला; परंतु ज्यावर तुम्ही तांबड्या पेन्सिलीच्या खुणा केलेल्या आहेत असा काही आढळला, तो मुद्दाम अत्यंत लक्षपूर्वक वाचला व तो मला समजलाही, नुसताच समजला नाही तर तो आवडलाही. एके ठिकाणी त्या ग्रंथकारानं असं लिहिलं आहे की, ''समाजातली कोणतीही व्यक्ती अन्यायानं वागली की, समाजाच्या स्वास्थ्याचा तोल बिघडतो, ज्यावर समाजाचं स्वास्थ्य आधारलेलं असतं असा जो समज आहे तो ढळतो, काटा झुकतो आणि तो काटा पूर्वस्थलावर केव्हा येतो, तर त्या अन्यायाला, या ना त्या प्रकारे अन्यायाने वागणाऱ्या व्यक्तीला शासन होतं तेव्हा! ढळलेला समतोलाचा काटा पूर्वस्थलावर आणण्यासाठी कोणी पुढं सरसावलं नाही तर ज्याची म्हणून सद्सद्विवेक बुद्धी जागी आहे अशा माणसानं ते काम आपलं कर्तव्य म्हणून केलं पाहिजे. एखाद्या व्यक्तीनं कायदा हातात घ्यावा हे दुष्कृत्य समजलं जातं, परंतु हा समज चुकीचा आहे. ते दुष्कृत्य नाही! सत्कृत्य ठरलं पाहिजे! भाऊ, तुम्ही मला दिलेल्या पुस्तकातल्या या विवेचनाचा माझ्यावर फार परिणाम झालेला आहे. म्हणून मी शांतारामला वाचविण्यासाठी पुढं झालो. मास्तरांच्या हातातली छडी काढून घेतली व बेभान अवस्थेत त्यांना सपासप दोन तडाखे मारले. माझ्याकडून हे गैरवर्तनच



झालं यात शंकाच नाही; पण तुम्ही विचारलंत म्हणून मी असा का वागलो ते सांगेन. तुम्ही मला दिलेल्या त्या पुस्तकानं असं शिकवलं की, एखादा अन्याय घडत असताना दिसला तर तटस्थ राहून बघता कामा नये. काही हिशोब असे असतात की ते चुकते झालेच पाहिजेत...!''

हेमू एवढं बोलला आणि गप्प झाला. भाऊ आता काय बोलतात कोण जाणे! अशा अनिश्चिततेचा भाव त्याच्या मुद्रेवर दिसला.

राजेनभाऊनी त्याला जवळ ओढून घेतलं. त्याच्या पाठीवर हात ठेवला व ते म्हणाले, ''हेमू, तुझं हे बोलणं ऐकून मी अगदी संतुष्ट झालो. मी दहा वर्षं कलेक्टरची नोकरी केली, अनेक कज्जे चालविले. अनेक नामांकित वकिलांची भाषणे ऐकली. प्रत्येक केसचा सद्सद्विवेक बुद्धीला जो निकाल योग्य वाटला तोच निकाल दिला. फ्रँक कॉलिन्सचं हे प्रतिपादन नेहमीच आठवत आलं आहे मला. काही हिशोब असे असतात की ते परिणामांची भीती न बाळगता कुणीतरी चुकते केलेच पाहिजेत. तुझ्या मनावर हे तत्त्व ठसलं आहे हे पाहून मला आनंद वाटतो. तुझा स्वभाव Impulsive आहे. मला पक्कं आठवतं की, आपण सुट्टीनिमित्त माथेरानला गेलो होतो. तिथं एकदा वाट अडवून निजलेल्या कुत्र्याला उठवून दूर होण्यासाठी माझ्याकडे आलेल्या व्हिजिटरनं बुटाच्या लाथेनं त्याला दूर केल्याबरोबर तू जागेवरून उठलास आणि हातातल्या पुस्तकाचा त्याच्या तोंडावर प्रहार करून त्याला म्हणालास, ''मुक्या जनावराला विनाकारण लाथ मारता? शरम वाटली पाहिजे तुम्हाला?'' हे करताना तू माझ्या हजेरीची पर्वा केली नाहीस! ते व्हिजिटर मोठे होते, प्रतिष्ठित होते त्याचा विचार केला नाहीस. अन्यायाचं योग्य ते बक्षीस ज्याचं त्याला दिलंस. काही हिशोब असे असतात की ते कुणीतरी चुकते केले पाहिजेत, याबद्दलचं प्रतिपादन तू आता वाचलंस; परंतु हे तत्त्व तुझ्या अंगी लहानपणापासून आहे. तू Impulsive आहेस. कधी यातून सुख निर्माण होईल, कधी दुःख भोगावं लागेल तुला; परंतु तू Impulsive असावंस असंच मी म्हणेन. थोर पुरुषांची चरित्रं वाचलीस तर तुला असंच आढळून येईल की ते सर्वजण Impulsive होते...''

बोलता बोलता राजेनभाऊ गप्प झाले. लेकाच्या चर्येकडे अतीव संतोषानं बघत राहिले आणि मग म्हणाले, ''जा. शाळेत झालेल्या प्रकरणाच्या बाबतीत तुम्हां सर्वांचं आणि माझं जे बोलणं झालं ते अत्यंत गुप्त ठेवण्याची दक्षता तू घे, पण शिवाय